# Swadeshi

INDUSTRIES & LEASING LTD.

CIN NO. L45209 MH 1983 PLC 031246

Ref :

Date :
Date: 29th May, 2023

To,
**BSE Limited,**
**Dept. of Corporate Services,**
PhirozeJeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400 001.

**Company Security Code –506863**

Dear Sir/Madam,

**Sub: Board Meeting of the Company on Friday, 26th May 2023.**

In terms of Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company has published the Audited financial results for the fourth quarter and financial year ended 31st March, 2023, which have been considered, approved and taken on record by the Board of Director at their meeting held on 26th May, 2023 in (financial Express) English Newspaper dated 28th may 2023 and (Mumbai Mitra) Marathi Newspaper dated 29th May, 2023.

Further, in pursuant of Regulation 47(3) and Regulation 30 read with schedule III, please find the below enclosed the copy of Newspaper articles as published in above mentioned newspaper.

Kindly take the same on your records.

Thanking you,

Yours faithfully,

ForSWADESHI INDUSTRIES AND LEASING LIMITED

SWADESHI INDUSTRIES AND LEASING CO. MUMBAI

Gaurav Jain
Managing Director
DIN -06794973
Address: 72, Jalipada, opp. payaltalkies,
Kaneriopp. Vijaya Bank,
Bhiwandi Thane 431302

# Swadeshi Industries & Leasing Limited

72 Teli Pada, Kaneri, Bhiwandi, Thane - 421302
Email: compliance@swadeshiglobal.com

**Extract of Audited Financial Results for the 4th quarter ended and Year Ended March 31, 2023**

(Rs. in Lacs)

| Sr. No. | Particulars | Quarter ended | | | Year Ended | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.03.2023 (Audited) | 31.12.2022 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) | 31.03.2023 (Audited) | 31.03.2022 (Audited) |
| 1 | Revenue From Operation | 74.34 | - | 20.71 | 72.73 | 33.99 |
| 2 | Net Profit / Loss before Tax | (1.86) | 0.53 | (53.67) | (9.97) | (86.84) |
| 3 | Net Profit / (Loss) for the period after Tax | (1.86) | 0.53 | (53.67) | (9.97) | (86.84) |
| 4 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | - | - | - | - | - |
| 5 | Equity Share Capital | 1,081.80 | 1,081.80 | 1,081.80 | 1,081.80 | 1,081.80 |
| 6 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | - | (282.34) | (272.37) |
| 7 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - | | | | | |
| | 1. Basic: | (0.02) | 0.01 | (0.50) | (0.09) | (0.80) |
| 8 | 2. Diluted: | (0.02) | 0.01 | (0.50) | (0.09) | (0.80) |

**Notes**

1. The Statement of financial result has been prepared in accordance with the Indian Accounting Standards (Ind AS) prescribed under section 133 of the Companies Act, 2013, read with the relevant rules issued thereunder and the recognised accounting practices and policies to the extent applicable.
2. The above text audited financial result has been duly approved by the Board of Directors Meeting held on 26th MAY 2023
3. The company operates mainly one segment, accordingly there are no separate reportable segment as per Ind AS -108- Operating Segment.
4. Previous period's figures have been reclassified, wherever necessary, to correspond with those of the current period.
5. The outbreak of Covid-19 pandemic across the globe and in India has contributed to a significant decline and volatility in the global and indian market and slowdown in economic activities. Since company has mainly engaged to Provide Basic necessary items hence there is least impact of covid-19 pandemic.
6. Income Tax including deferred tax will be determined and provided for at the end of the financial year.
7. Investors can view the Financial Results of the Company at the Company's website www.swadeshiglobal.com or at the websites of BSE(www.bseindia.com).
8. Fair valuation of Investments are done by the Managements of the company according to latest audited Fianacial Statements.

**For Swadeshi Industries & Leasing Ltd**
**Gaurav Jain**
**Managing Director**
**DIN: 06794973**

**Place : Mumbai**
**Date: 30th May 2022**

# समृद्धी महामार्गावर १६ हेलिपॅड, अपघातानंतर जखमींवर तात्काळ उपचारासाठी एमएसआरडीसीचा निर्णय

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई नागपूर समृद्धी महामार्गावरील वाढते अपघात हा सध्या चिंतेचा विषय बनला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) समृद्धी महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी कृती आराखडा तयार केला आहे. अपघात झाला वा इतर कोणतीही दुर्घटना घडल्यास तातडीने हवाई रुग्णवाहिकेच्या माध्यमातून जखमींना तात्काळ योग्य उपचार मिळावेत यासाठी समृद्धी महामार्गावर १६ हेलिपॅड बांधण्यात येणार आहेत. यासंबंधीच्या निविदा अंतिम करण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून लवकरच या कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

समृद्धी महामार्गामुळे नागपूर भरवीरदरम्यानचा प्रवास सहा तासांत पूर्ण करणे शक्य झाले आहे. मात्र समृद्धी महामार्गावरील अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. वाहनचालक वेगमर्यादा पाळत नसल्याने, तसेच महामार्ग संमोहनामुळे सर्वाधिक अपघात होत असल्याचेही निदर्शनास आले



आहे. त्यामुळे समृद्धी महामार्गारील दिवसेंदिवस होणारे अपघात चिंतेचा विषय बनला आहे. अपघात रोखण्यासाठी कृती आराखड्याच्या माध्यमातून उपाययोजना करण्यास सुरुवात झाली आहे. मुळात या महामार्गावरील अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी महामार्गालगत प्रत्येक ३० किमी अंतरावर हॅलिपॅड उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर महामार्गालगतच्या १६ विविध सेवा-सुविधांच्या योजनेत (फूड प्लाझा, पेट्रोल पंप आणि इतर सुविधा) या हेलिपॅडला समावेश आहे. त्यानुसार महामार्गालगत १६ हेलिपॅड बांधण्यात येणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे सहव्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

महामार्गालगत १६ ठिकाणी विविध सेवा पुरविण्यासाठी एकत्रित निविदा मागविण्यात आली आहे. प्रतिसाद न मिळाल्याने या निविदेला अनेक वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. अखेर एक निविदा सादर झाली असून या निविदेची छाननी सुरू आहे. लवकरच निविदा अंतिम करण्यात येणार आहे. या १६ ठिकाणच्या सेवा-सुविधांमध्ये हेलिपॅडचाही समावेश आहे. लवकरच या सेवा-सुविधांचा विकास करण्यात येणार आहे, असेही गायकवाड यांनी सांगितले.

# मिठीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याचा पालिकेचा दावा

## दररोज ८० लाख लिटर क्षमतेचा प्रकल्प कार्यरत

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई महानगरपालिकेने 'मिठी नदी जल गुणवत्ता सुधार' प्रकल्प हाती घेतला असून या प्रकल्पाअंतर्गत मिठी नदीतील काही लाख लिटर पाण्याची गुणवत्ता वृद्धींगत करून ते पुन्हा नदीत सोडण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे मिठी नदीतील पाण्याची गुणवत्ता सुधारत असल्याचा दावा मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आला आहे. दरम्यान, पाण्याच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्यामुळे मिठी नदीत काही ठिकाणी मासे दिसू लागले आहेत, असाही दावा महानगरपालिकेकडून करण्यात आला आहे.

महानगरपालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरासू यांच्या मार्गदर्शनानुसार 'मिठी नदी जल गुणवत्ता सुधार' प्रकल्प राबविण्यात येत आहे. मुंबईतच उगम पावणाऱ्या आणि मुंबईतच समुद्राला जाऊन मिळणाऱ्या मिठी नदीची एकूण लांबी १७.८४ किलोमीटर इतकी आहे. या नदीचे पाणलोट क्षेत्र साधारणपणे ७ हजार २९५ हेक्टर एवढे आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील विहार आणि पवई तलावांमधून होणारा विसर्ग हा या नदीचा प्रमुख जलस्रोत आहे. ही नदी माहिमच्या खाडीतून समुद्राला जाऊन मिळते.

मुंबईमध्ये २६ जुलै २००५ रोजी आलेल्या प्रलयंकारी पावसानंतर पूरस्थिती हाताळण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मिठी



नदी विकास आणि संरक्षण प्राधिकरणाची (एमआरडीपीए) १९ ऑगस्ट २००५ रोजी स्थापना करण्यात आली. त्यानंतर केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्र (सीडब्ल्यूपीआरएस) आणि सत्यशोधन समितीच्या शिफारसींनुसार दोन टप्प्यांमध्ये मिठी नदीचे रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षण भिंत व सेवा रस्ता बांधण्याचे काम हाती घेण्यात आले होते. यातील बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. एकेकाळी वाहती आणि समृद्ध नदी म्हणून ओळख असणारी मिठी कालांतराने घनकचरा, सांडपाणी, अतिक्रमण आदी समस्यांनी ग्रासली गेली आणि या नदीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. सफेद पूल नाला, मरोळ बापट नाला आणि वाकोला नाला मिठी नदीला येऊन मिळतात. त्यामुळे ही नदी एका मोठ्या नाल्याप्रमाणेच भासत होती.

'मिठी नदी विकास आणि प्रदूषण नियंत्रण प्रकल्पा'अंतर्गत सध्या मिठी नदीतील पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी पवई भागात दररोज ८० लाख लिटर क्षमतेचा जल गुणवत्ता सुधारणा प्रकल्प जानेवारी २०२३ पासून अव्याहतपणे कार्यरत आहे. या प्रकल्पाद्वारे शुद्धीकरण केलेले पाणी पुन्हा मिठी नदीमध्ये सोडण्यात येत आहे. यामुळे मिठी नदीतील पाण्याच्या गुणवत्तेत सुधारणा होण्यासह नदीतील जैवविविधता अबाधित राखण्यास व जैवविविधतेची वृद्धी होण्यास मदत होत आहे, असा दावा महानगरपालिकेकडून करण्यात आला आहे.



अभिजीत राणे www.abhijeetrane.in समुह संपादक मुंबई मित्र | वृत्त मित्र

www.aryf.in | www.dhadakkamgarunion.in | www.livemumbaimitra.com

■ **पटोले, राऊत आहेत नुसतेच बोलघेवडे; फडणवीसांनी सुनावले बोल खडे!**

मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर राज्यातील सरकार पडेल, असे कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले. यावर बोलताना फडणवीसांनी एका दगडात दोन पक्षांवर अर्थात राऊत आणि पटोलेंवर निशाणा साधला आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होणार असल्याचे फडणवीसांनी स्पष्ट केले. संजय राऊतांच्या प्रश्नावर बोलताना कोण संजय राऊत? अशा शब्दांत फडणवीसांनी बोचरी टीका केली. महाविकास आघाडीमध्ये काहीही झाले तरी त्याचे खापर भाजपवर फोडले जाते, 'इतरांच्या घरी मुलगा झाला तरी त्यात आमचा हात आहे असे म्हणू नये म्हणजे झाले', अशा शब्दांत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. संजय राऊत आणि नाना पटोले हे बोलघेवडे असून आम्हाला खूप काम आहे, त्यामुळे त्यांना उत्तर देत नाही असेही फडणवीस म्हणाले आहेत. पटोले आणि राऊत यांच्या तथ्यहीन दाव्यांना फडणवीस यांनी उत्तर देण्याची गरज नाही. मात्र 'खोटे बोल पण रेटून बोल' अशा पद्धतीने सातत्याने वर्तन करणाऱ्यांना कुठेतरी चपराक लगावायलाच हवी, म्हणूनच फडणवीसांनी या दोघांना सुनावले आहे.

## कवडसा



**अशोक राणे**
राजकीय संपादक,
दै. मुंबई मित्र/वृत्त मित्र

स्वातन्त्र्य वीर वि दा सावरकर यॉंचा जन्म दिवस.. जाज्वल्य राष्ट्र भक्ति..मराठी भाषा अभिमान.व.... उत्क्रुश्ट साहित्य निर्मिति.स्वातंत्र्य प्रप्तिसाठि केलेल योगदान अतुलनीय..अंदमान येथील कारावास वा त्यॉंचाझालेला छल.सर्वाना परिचित...आशिनिष्ठा..राष्ट्र प्रेम आता दुर्मील...हिंदू धर्म वा मुस्लिम याबाबत त्यानी मान्डलेले विचार स्फोटक होते..मुस्लिमॉंच्या वाढत्या संखे विशयि केलेल भाकीत खर ठरतय..आता त्यॉंच्या नावानी राज़ कारण होतय..पण जयस्तूते नमस्तूते आणि सागरा प्राण तलमलला... अप्रतिम..आज हि हेलाउन सडत..तसच संन्यस्तखड्ग ह नाटक..आणि शत जन्म शोधिताना..हे पद अतुलनीय आणि अजरामर.करूँ या त्रिवार वन्दन या स्वातंत्र्य सूर्याला......

स्मृति दिन सुप्रसिद्ध निर्माता दिगदर्शक महबूब खान यांचा त्यांचा जन्म बिलीमोरा येथे ०९/०९/१९०७ रोजी झाला बालपनापासुन त्याना चित्रपताच आकर्षण होत त्यातुनच ते मुंबई ला आले त्यानी आधी छोटे मोठे रोल केले व पूढ़ नायक ही झाले पन त्यांचा कल चित्रपट निर्मिती व दिग्दर्शन या कड़े होता त्यातुनच त्यानी औरत हचित्रपट निर्माण केला सामाजिक आशय आनी त्याच् भान त्याना असल्याने त्यांचे चित्रपट गाजले आणि अविस्मरणीय थरले त्यानी ऐलान अंदाज आन हे चित्रपट बनवले त्यानी आपल्याच औरत या चित्रपटा चा रीमेक मदर इंडिया नावाने केला नरगिस सुनील दत्त राजेंद्र कुमार राजकुमार कुमकुम कन्हैयालाल अशिभक्कम स्टार कास्ट होती अभिनय निर्मीति दिग्दर्शन संगीत सर्व उत्कृष्ट असल्याने त्यान फिल्मफेयर तर मिलवलच पन इतर अवाड्र्स ही मिलवलीहा चित्रपट हिंदी चित्रपट क्षेत्रात माइल स्टोन थ रला अशा या दिग्गज निर्माता दिदर्शकाने २८/०५/१९६४ रोजी इहलोकाची यात्रा संपाविली या दिग्गज। व्यक्तित्वाला अभिवादन आनी आदरांजलि

# ब्रिच कॅण्डी परिसरात उंच इमारतीत रात्री आग

■ प्रतिनिधी, मुंबई

दक्षिण मुंबईतील पेडररोड येथील ब्रीच कँण्डी येथे एका उच्चभ्रू इमारतीत शनिवारी रात्री अचानक आग लागली. पंधरा मजली इमारतीच्या बाराव्या मजल्यावर आग लागली होती.

ब्रीच कँण्डी रुग्णालयाजवळ असलेल्या ब्रीच कँण्डी गृहनिर्माण सोसायटीच्या इमारतीत रात्री आग लागली होती. बाराव्या मजल्यावरील दोन फ्लॅटमध्ये ही आग पसरली होती. त्यामुळे बाराव्या मजल्यावर संपूर्ण धूर पसरला होता. अग्निशमन दलाचा ताफा ४ पाण्याचे ट्रँकर, पाच फायर इंजिन, श्वसन उपकरणे यासह घटनास्थळी दाखल झाला होता. अग्निशमन दलाने बचावकार्य हाती घेऊन एक महिला व एका पुरुषाची बाराव्या मजल्यावरून सुटका केली. या दोघांना जिन्याने खाली आणण्यात आले. रात्री साडेअकराच्या सुमारास अग्निशमन दलाने क्रमांक दोनची वर्दी दिली.

# पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर वाहनांच्या वेगावर लवकरच नियंत्रण

## 'एचटीएमएस'अंतर्गत कामे अंतिम टप्प्यात

■ प्रतिनिधी, मुंबई

पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी महामार्ग वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम एचटीएमएस) अंतर्गत कामे सुरू झाली आहेत. सप्टेंबर महिन्यापर्यंत ही कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यानुसार या महामार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवता येणार आहे. तसेच संपूर्ण मार्गावर ९३ ठिकाणी ३७० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत. परिणामी अति वेगाने वाहन चालविणे, मार्गिका तोडणाऱ्या वाहनांवर तत्काळ कारवाई करणे सोपे होणार आहे.

द्रुतगती महामार्गावरील वाढत्या वेगामुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाने एचटीएमएस प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार दर चार कि. मी. अंतरावर वेग तपासणारी यंत्रणा, मार्गिका तोडली जात आहे किंवा कसे, याबाबतची यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे. वेगमर्यादेवर नियंत्रण ठेवणारी विशेष प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे. याशिवाय पुणे-मुंबई दरम्यान अनेक वळणे, घाट, धबधबे आणि इतर निसर्गरम्य ठिकाणे असल्याने प्रवासी रस्त्याच्या कडेला वाहने थांबवितात. तसेच उपाहारगृह किंवा इतर ठिकाणी वाहने थांबविल्याने वाहतुकीच्या दृष्टीने वर्दळीच्या मार्गावर अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने आयआरबी कंपनीकडून महामार्गालगत ठरावीक अंतरांवर वाहन थांबे करण्याचा प्रस्ताव आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ठराविक अंतरानंतर वाहनांसाठी थांबे उभारणे गरजेचे असून याबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. राज्य शासनाकडून मान्यता मिळताच ही कामेही करण्यात येणार आहेत.

याबाबत बोलताना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर म्हणाले, 'पुणे-मुंबई महामार्गावरील वाहतूक सुरक्षिततेबाबत राज्य सरकारच्या आदेशानुसार एचटीएमएस प्रणाली अंतर्गत कामांना सुरुवात करण्यात आली आहे. ठरावीक अंतरावर सीसीटीव्ही आणि वेग नियंत्रणावर लक्ष ठेवणारे यंत्र लावण्यात येत आहेत. ही कामे ४० टक्के पूर्ण झाली आहेत. सप्टेंबर अखेपर्यंत ही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. सद्य:स्थितीला वाहतूक पोलीस आणि महामार्ग अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून बेशिस्त वाहनधारकांवर कारवाई करण्यात येत आहे. महामार्गालगत असणारी निसर्गरम्य ठिकाणे, घाट रस्त्यात वाहने थांबविली जातात, अशा वाहनधारकांवर देखील कारवाई करण्यात येत आहे.

# दोन लाख रुपयांचा मोबाइल चोरणारा अटकेत

■ प्रतिनिधी, मुंबई

मध्य रेल्वेवरील लोकलमध्ये मोबाइल चोरांचा सुळसुळाट झाला असून त्यामुळे प्रवासी आणि रेल्वे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. एका महिलेचा दोन लाख दहा हजार रुपयांचा मोबाइल नुकताच लोकल प्रवासात चोरीला गेला होता. या प्रकरणी सीएसएमटी रेल्वे पोलिसांनी चोराचा शोध घेतला असून हेमराज बन्सीवाल (३०) आणि देविलाल चौहान (३२) यांना अटक करण्यात आली आहे. या दोघांनी चोरलेला महिलेचा मोबाइल हस्तगत करण्यात आला असून या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.



हार्बर मार्गावरील टिळकनगर सीएसएमटी लोकलच्या प्रथम श्रेणी डब्यातून तक्रारदार महिला बुधवारी प्रवास करीत होती. सकाळी ११.३० च्या दरम्यान सीएसएमटी येथे लोकल पोहचली असता मोबाइल चोरीला गेल्याचे तक्रारदार महिलेच्या लक्षात आले. त्यानंतर महिलेने मोबाइल चोरीला गेल्याची तक्रार सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाण्यात केली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश शिरसाट आणि त्यांच्या पथकाने या प्रकरणी तपास सुरू केला. आरोपीचा शोध घेण्यासाठी रेल्वे पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाची तपासणी केली असता एक व्यक्ती संशयास्पद हालचाली करीत असल्याचे निदर्शनास आले. ही व्यक्ती सीएसएमटी स्थानकावरील फलाट क्रमांक १ व २ वर असल्याचे समजताच रेल्वे पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्याने आपले नाव हेमराज बन्सीवाल (३०) असल्याचे आणि कुर्ला येथे राहत असल्याचे सांगितले. दोन लाख १० हजार रुपयांचा मोबाइलबाबत विचारणा केली असता त्याने तो लोकलच्या प्रथम श्रेणी डब्यात सापडल्याचे सांगितले. तसेच कुर्ला येथील देविलाल चौहानला (३१) हा मोबाइल तीन हजार रुपयांना विकल्याची माहिती त्याने दिली. रेल्वे पोलिसांनी देविलालला त्याच्या घरून ताब्यात घेतले. त्यानंतर हेमराज बन्सीवाल आणि देविलाल चौहान यांना अटक करण्यात आली.

**Swadeshi Industries & Leasing Limited**

72 Teli Pada, Kaneri, Bhiwandi, Thane - 421302

Email: compliance@swadeshiglobal.com

**Extract of Audited Financial Results for the 4th quarter ended and Year Ended March 31, 2023**

(Rs. in Lacs)

| Sr. No. | Particulars | Quarter ended | | | Year Ended | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.03.2023 (Audited) | 31.12.2022 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) | 31.03.2023 (Audited) | 31.03.2022 (Audited) |
| 1 | Revenue From Operation | 74.34 | - | 20.71 | 72.73 | 33.99 |
| 2 | Net Profit / Loss before Tax | (1.86) | 0.53 | (53.67) | (9.97) | (86.84) |
| 3 | Net Profit / (Loss) for the period after Tax | (1.86) | 0.53 | (53.67) | (9.97) | (86.84) |
| 4 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | - | - | - | - | - |
| 5 | Equity Share Capital | 1,081.80 | 1,081.80 | 1,081.80 | 1,081.80 | 1,081.80 |
| 6 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | - | (282.34) | (272.37) |
| 7 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - | | | | | |
| | 1. Basic: | (0.02) | 0.01 | (0.50) | (0.09) | (0.80) |
| 8 | 2. Diluted: | (0.02) | 0.01 | (0.50) | (0.09) | (0.80) |

**Notes**

1. The Statement of financial result has been prepared in accordance with the Indian Accounting Standards (Ind AS) prescribed under section 133 of the Companies Act, 2013, read with the relevant rules issued thereunder and the recognised accounting practices and policies to the extent applicable.
2. The above text audited financial result has been duly approved by the Board of Directors Meeting held on 26th MAY 2023
3. The company operates mainly one segment, accordingly there are no separate reportable segment as per Ind AS-108- Operating Segment.
4. Previous period's figures have been reclassified, wherever necessary, to correspond with those of the current period.
5. The outbreak of Covid-19 pandemic across the globe and in India has contributed to a significant decline and volatility in the global and indian market and slowdown in economic activities. Since company has mainly engaged to Provide Basic necessary items hence there is least impact of covid-19 pandemic.
6. Income Tax including deferred tax will be determined and provided for at the end of the financial year.
7. Investors can view the Financial Results of the Company at the Company's website www.swadeshiglobal.com or at the websites of BSE(www.bseindia.com).
8. Fair valuation of Investments are done by the Managements of the company according to latest audited Fianacial Statements.

For Swadeshi Industries & Leasing Ltd
Gaurav Jain
Managing Director
DIN: 06794973

Place : Mumbai
Date: 30th May 2022